# कोरोनामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला

## शैक्षणिक वर्षावर परिणाम | विद्यापीठांच्या परीक्षा स्थगित

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोरोनामुळे विद्यापीठांच्या परीक्षा स्थगित झाल्या आहेत; मात्र या परीक्षांच्या स्थगितीमुळे चालू शैक्षणिक वर्षावर त्याचा मोठा परिणाम झाला आहे. त्याचबरोबर प्रवेशच उशिरा झाल्यास पुढील शैक्षणिक वर्षही उशिरा सुरू होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला लागले आहे.

विद्यापीठ आणि महाविद्यालयांच्या परीक्षेसंदर्भात राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालयाकडून पर्याय शोधण्यात येत होते. त्याचाच एक भाग म्हणून उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंशी व्हिडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून संवाद साधत विद्यापीठांच्या परीक्षांसंदर्भात गठित समितीचा आढावा घेतला; मात्र विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) सूचना प्राप्त झाल्यानंतरच परीक्षांबाबतचा निर्णय घेणार असल्याचे जाहीर करण्यात आले. त्यामुळे परीक्षांच्या निर्णयाची वाट पाहणाऱ्या विद्यार्थी आणि पालकांना पुन्हा थांबावे लागणार आहे.

सध्या विद्यापीठाच्या परीक्षांना आधीच उशीर झाला आहे. लॉकडाऊन झाल्यानंतर यूजीसीच्या सूचनेनंतर परीक्षांची प्रक्रिया पूर्ण करण्यासही मोठा वेळ जाणार आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर पुढील प्रवेश प्रक्रिया पूर्ण होण्यास जवळपास पहिल्या सेमिस्टरचा वेळ जाणार आहे. त्यामध्ये जे विद्यार्थी पदवीच्या अखेरच्या वर्षाची परीक्षा देत आहेत, त्यांचे पदव्युत्तर शिक्षणाचे पहिले वर्षही कोरोनाच्या फेऱ्यात अडकणार आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांचे डोळे लॉकडाऊन, यूजीसीच्या सूचना आणि राज्य शासनाच्या निर्णयाकडे लागले आहेत.



### अडीच लाख विद्यार्थी चिंतेत

शिवाजी विद्यापीठांतर्गत कोल्हापूरसह सांगली आणि सातारा जिल्ह्यातील २९३ महाविद्यालये येतात. या महाविद्यालयांतील सुमारे अडीच लाख विद्यार्थ्यांची ६८० परीक्षा होणे बाकी आहे. परीक्षा कधी आणि कशा होणार, याची चिंता या विद्यार्थ्यांना लागून राहिली आहे.

# रस्त्यावर न उतरता योगदान शक्य

## डॉ. करमळकर : 'शिवाजी विद्यापीठ, युनिसेफ'तर्फे ऑनलाईन प्रशिक्षण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

'कोव्हीड-१९' साथीच्या काळात थेट रस्त्यावर न उतरतासुद्धा राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांसह सर्वसामान्य विद्यार्थ्यांनासुद्धा खूप मोठ्या प्रमाणावर सामाजिक योगदान देता येऊ शकते, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी केले.


शिवाजी विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना कक्ष आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने कोरोनासंदर्भात घ्यावयाच्या दक्षतेबाबत यूट्युबच्या माध्यमातून ऑनलाईन प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी ते बोलत होते.

प्रशिक्षण सत्राचा समारोप करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांमधील राष्ट्रीय सेवा योजनेचे सुमारे २८ हजार स्वयंसेवक सोशल मीडियाचा वापर करत ५० लाखांहून अधिक लोकांपर्यंत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पोहोचत आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या वसतिगृहांत १ हजार बेडचे आयसोलेशन केंद्र सुरू केले गेले आहे.

या प्रशिक्षण सत्रात एनएसएसच्या महाराष्ट्र व गोवा विभागाचे प्रादेशिक संचालक डी. कार्थिजेन, राज्य समन्वयक डॉ. अतुल साळुंखे, युनिसेफच्या अधिकारी डॉ. अपर्णा देशपांडे, डॉ. ज्योती पोटारे, डॉ. जी. के. पांडगे, डॉ. राजलक्ष्मी नायर आणि डॉ. स्वाती मोहपात्रा यांनी मार्गदर्शन केले. डॉ. प्रभाकर देसाई यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. या ऑनलाईन प्रशिक्षणात एनएसएसचे राज्यभरातील समन्वयक, स्वयंसेवक, आजी - माजी स्वयंसेवक - स्वयंसेविका आजी - माजी विद्यार्थी - विद्यार्थिनी, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी यांच्यासह नागरिकही सहभागी झाले.

पुढारी

# कोल्हापूर प्रदूषणमुक्त!



## लॉकडाऊनमुळे शहरात प्रदूषण दहा वर्षांच्या नीचांकी पातळीवर

कोल्हापूर : आशिष शिंदे

**संचारबंदी व लॉकडाऊनमुळे देशातील वायू प्रदूषणात लक्षणीय घट झाली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडील आकडेवारीनुसार शहरात गेल्या १० वर्षांच्या तुलनेत पहिल्यांदाच हवेतील सूक्ष्म धूलिकणांची (आरएसपीएम) पातळी निर्धारित मानकाच्या आत पाहायला मिळाली आहे. नायट्रोजन डायऑक्साइड, सल्फर डायऑक्साईडच्या प्रमाणातही लक्षणीय घट झाली आहे. परिणामी, धूलिकणांमुळे हैराण झालेल्या कोल्हापूरकरांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे.**

शहरातील रस्त्यांची झालेली दुर्दशा, पदपथांवर साठलेली माती, जागोजागी सुरू असलेली बांधकामे, खोदकामे, वाढती वाहतूक कोंडी यामुळे कार्बन डायऑक्साईड, नायट्रोजन डायऑक्साईडवसल्फरडायऑक्साईड या विषारी वायूपेक्षा शहरातील धूलिकणांचे व सूक्ष्म धूलिकणांचे प्रमाण वाढले होते; मात्र लॉकडाऊनच्या काळात सूक्ष्म धूलिकणांचे, तसेच नायट्रोजन डायऑक्साईड व सल्फर डायऑक्साईडचे प्रमाणही कमी झाल्याने शहरातील हवेच्या प्रदूषणात कमालीची घट झाली असल्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उप प्रादेशिक अधिकारी प्रशांत गायकवाड यांनी सांगितले.

पान ४ वर ▶

### सूक्ष्म धूलिकण पातळी पहिल्यांदाच निर्धारित मानकाच्या आत

### नायट्रोजन डायऑक्साईड, सल्फर डायऑक्साईडचे प्रमाणही घटले

**आकडे काय सांगतात..?**

लॉकडाऊनच्या काळात (६ एप्रिल ते १२ एप्रिल) नायट्रोजन डायऑक्साईड व सल्फर डायऑक्साईडच्या प्रमाणात कमालाची घट झाली आहे. जानेवारी, फेब्रुवारी महिन्यात दाभोळकर कॉर्नर परिसरातील केंद्रावरून १७ वेळा हवेची गुणवत्ता तपासण्यात आली होती. या १७ नमुन्यांमध्ये सल्फर डायऑक्साईडचे सर्वाधिक प्रमाण ४० मायक्रोग्रॅम पर क्युबिक मीटर इतके होते. तेच लॉकडाऊनच्या काळात १८.४५ मायक्रोग्रॅम पर क्युबिक मीटरवर आले होते. याच कालावधीत नायट्रोजन डायऑक्साईडचे सर्वाधिक प्रमाण ८३ वरून ३०.८२ वर आले आहे. महाद्वार रोड परिसर व शिवाजी विद्यापीठ परिसरातील केंद्रावरील याच कालावधीत सल्फर डायऑक्साईडचे प्रमाण अनुक्रमे ३० व २० मायक्रोग्रॅम पर क्युबिक मीटर होते. तेच लॉकडाऊनच्या काळात १३.६१ व ७.१३ मायक्रोग्रॅम पर क्युबिक मीटर इतके झाले आहे.

पुढारी

# कोल्हापूर प्रदूषणमुक्त!

(पान १ वरून) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने शहरात तीन ठिकाणी हवेची गुणवत्ता मोजण्यासाठी केंद्रे उभारण्यात आली आहेत. गेल्या दहा वर्षांतील (२०१० ते २०२०) दाभोळकर कॉर्नर परिसरातील दरवर्षीच्या अहवालातील एप्रिल महिन्यातील आकडेवारी पाहिली, तर सूक्ष्म धूलिकणांचे प्रमाण निर्धारित मानकाच्या (१०० मायक्रोग्रॅम पर क्युबिक मीटर) आत एकदाही नव्हते. मात्र लॉकडाऊनच्या काळात (६ एप्रिल ते १२ एप्रिल) या परिसरातील सूक्ष्म धूलिकणांचे प्रमाण दहा वर्षांत पहिल्यांदाच निर्धारित मानकाच्या आत होते. ७४.६५ मायक्रोग्रॅम पर क्युबिक मीटर इतके प्रमाण होते. तर शिवाजी विद्यापीठ परिसर व महालक्ष्मी मंदिर परिसरातील केंद्रांवरील नमुन्यांमध्ये लॉकडाऊनच्या काळात सूक्ष्म धूलिकणांची पातळी अनुक्रमे ४२.३६ व ५३.८२ मायक्रोग्रॅम पर क्युबिक मीटर इतकी होती. गेल्या दहा वर्षांत एप्रिल महिन्यात या केंद्रावरून घेतलेल्या नमुन्यांची तुलना केल्यास एकदाही सूक्ष्म धूलिकणांची पातळी इतकी कमी नव्हती, तर अनेकदा ती निर्धारित मानकाच्या वरतीच होती.

Edition
26 Apr, 2020 Page No. 2
Powered by : erelego.com

पुढारी

# दहा सेंटरवर ५८१ नागरिक अलगीकरण कक्षात

कोल्हापूर : कोरोना प्रतिबंधासाठी मनपातर्फे स्थापन करण्यात आलेल्या दहा अलगीकरण कक्षांमध्ये ५८१ नागरिकांना ठेवण्यात आले. यामध्ये शेंडापार्क कक्षामध्ये ४६, खासगी ठिकाणी १९ आणि अंडी ऊबवणी केंद्र येथे २८, पंजाबराव देशमुख वसतिगृहात १०४, गव्हर्न्मेंट पॉलिटेक्निकमध्ये २६ व राजाराम कॉलेजमध्ये ४०, अल्पसंख्याक मुलींच्या वसतिगृहात ८५, आयसोलेशनमध्ये १४, कृषी विद्यापीठात १८६, शिवाजी विद्यापीठात ३३ नागरिकांना अलगीकरण कक्षामध्ये ठेवले आहे.

Edition
26 Apr, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com